MHAU080017352021

**नियमित दिवाणी दावा क्र.१८१/२०२१**
**नमन उर्फ लक्ष्मीनारायण वि. सोमप्रकाश**

## निशाणी ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता केला आहे.

२. **वादी यांचे थोडक्यात कथन असे की,**

वादी हे मौजे शिवना, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ८७३, क्षेत्र ३८ x १९ ज्याची चतु:सिमा दावा विषयात सविस्तर नमूद केली आहे. या चतु:सिमेच्या आतील मिळकतीमध्ये वादी मालक व ताबेदार आहे. (सदर मिळकतीस दावा मिळकत म्हणून संबोधण्यात आले आहे).

३. अर्जदाराचे कथन असे की, वादी व प्रतिवादी हे वरिल ठिकाणचे रहिवाशी आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ हे वादींचे मुले असून प्रतिवादी क्र. २ व ३ सुना आहेत. प्रतिवादी हे वादीचा सांभाळ करीत नाही व विनाकारण या ना त्या कारणावरुन त्रास देत असतात व प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये येवून वादी व त्यांच्या पत्नीस सतत शिवीगाळ करीत असतात व घर खाली करण्याच्या धमक्या देत असतात. दावा मिळकतीशी त्यांचा काही संबंध नसतांना ते वादींना शिवीगाळ करुन धमक्या देत आहे. त्यामुळे, वादीचे जिवन जगने मुश्कील होत आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रतिवादी विरुध्द आईवडील व जेष्ठ नागरीक यांचे भरणपोषण व कल्याण अधिनियम २००७ अन्वये संरक्षण मिळणेसाठी अर्ज दाखल केला असून तेथे काहीही होत नाही. सदर प्रकरणाच्या नोटीसा प्रतिवादी यांना मिळाल्याचा राग मनात धरुन प्रतिवादी हे वादीस त्रास देत

आहे व सतत घरामध्ये येवून शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या देत आहे. प्रतिवादी सतत दावा मिळकतीमध्ये येवून अडथळा करीत आहे. त्यामुळे, वादी प्रतिवादी विरुध्द पोलीस स्टेशन अजिंठा, ता. सिल्लोड येथे तक्रार नोंदविण्यासाठी गेले असता, पोलीसांनी सदर प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्यामुळे, मा. दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचे सांगितले. त्यामुळे, वादी यांनी मा. न्यायालयात सदरचा दावा दाखल करण्याचे कारण घडलेले आहे. अर्जदाराचे कथन असे की, प्रतिवादी हे सुड भावनेने वादीस दावा मिळकतीमध्ये अडथळा निर्माण करुन बेकायदेशीरपणे वादीस घराबाहेर काढून देण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यामुळे प्रतिवादी यांना दावा मिळकतीमध्ये येवून वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करु नये म्हणून वेळीच पावबंद करणे आवश्यक आहे, नसता वादीचा दावा मिळकतीवरील ताबा जावून वादीस म्हतारपणामध्ये बेघर होण्याची भिती निर्माण झाली आहे. प्रतिवादी हे त्यांच्या कुटील हेतूमध्ये साध्य झाले तर वादीचा दावा मिळकतीवरील असलेला ताबा जाण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे. वादीचा दावा हा प्रथमदर्शनी असून वादीकडे दावा सिध्द करण्यासाठी पुरावा आहे. दिनांक १३.०९.२०२१ रोजी वादी व प्रतिवादींनी शिवीगाळ करुन दावा मिळकतीमध्ये अडथळा निर्माण केला व घराबाहेर हाकलून देवून अशी धमकी दिली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली असून, प्रतिवादी हे बळाचा वापर करुन वादीस दावा मिळकतीमधून कधीही बेदखल करु शकतात अशी भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे, मा. न्यायालयात दावा दाखल करण्याचे दिनांक १३.०९.२०२१ रोजी कारण घडलेले आहे. त्यामुळे, वादीने मनाई हुकूम मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे, मा. साहेबांनी मुळ दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादीच्या मालकी, ताब्यातील दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी, त्यांचे नौकर चाकर, एजंट हस्तक, नातेवाईक यांनी वादींच्या ताब्यास अडथळा निर्माण करु नये म्हणून वादी यांनी प्रतिवादी यांना तात्पुरत्या मनाई हुकूमाद्वारे पावबंद करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत दावा नि. क्र. १ वरील आदेशानुसार एकतर्फी चालविण्यात आला आहे.

५. प्रस्तुतच्या अर्जावर वादीतर्फे ॲड. जी. व्ही. ढोणे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

६. वादीने या अर्जाच्या समर्थनार्थ दस्त यादी नि. क्र. ४ सोबत, नमुना नं. ८ च्या उता–याची प्रत, आधारकार्डची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. तसेच, मा. उपविभागीय अधिकारी साहेब, सिल्लोड यांची प्राप्त नोंद असलेली, वादी यांनी प्रतिवादींविरुध्द, आईवडील व जेष्ठ नागरीक यांचे भरणपोषण व कल्याण अधिनियम, २००७ अन्वये गैरअर्जदारापासून संरक्षण व खावटी मिळणेबाबत केलेल्या दिनांक १६.०७.२०१९ रोजीचा अर्जाची प्रत.

७. वादीच्या अर्जातील कथने, आणि अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा विचारात घेता या अर्जाच्या निवाडयासाठी माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यावर कारणांसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने हे सिध्द केले आहे का, की, त्यांची प्रथमदर्शनी केस (दावा) आहे का? | होय |
| २ | वादीने हे सिध्द केले आहे का, की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | होय |
| ३ | वादीने हे सिध्द केले आहे का, की, तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास त्याचे कधीही न भरुन येण्याजोगे नुकसान होणार आहे काय? | होय |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार अर्ज मंजूर |

## कारणमिमांसा

मुद्दे क्र. १ ते ३ करीता –

८. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र. १ ते ४ हे वादीचा सांभाळ करीत नाही व विनाकारण या ना त्या कारणावरुन त्रास देत असतात व प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये येवून वादी व त्यांच्या पत्नीस सतत शिवीगाळ करीत असतात व घर खाली करण्याच्या धमक्या देत

असतात. दावा मिळकतीशी त्यांचा काही संबंध नसतांना ते वादींना शिवीगाळ करुन धमक्या देत आहे. त्यामुळे, वादीचे जिवन जगने मुश्कील होत आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रतिवादी विरुध्द आईवडील व जेष्ठ नागरीक यांचे भरणपोषण व कल्याण अधिनियम २००७ अन्वये संरक्षण मिळणेसाठी अर्ज दाखल केला असून तेथे काहीही होत नाही. सदर प्रकरणाच्या नोटीसा प्रतिवादी यांना मिळाल्याचा राग मनात धरुन प्रतिवादी हे वादीस त्रास देत आहे व सतत घरामध्ये येवून शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या देत आहे. प्रतिवादी सतत दावा मिळकतीमध्ये येवून अडथळा करीत आहे. त्यामुळे, वादी प्रतिवादी विरुध्द पोलीस स्टेशन अजिंठा, ता. सिल्लोड येथे तक्रार नोंदविण्यासाठी गेले असता, पोलीसांनी सदर प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्यामुळे, मा. दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचे सांगितले. त्यामुळे, वादी यांनी मा. न्यायालयात सदरचा दावा दाखल करण्याचे कारण घडलेले आहे. अर्जदाराचे कथन असे की, प्रतिवादी हे सुड भावनेने वादीस दावा मिळकतीमध्ये अडथळा निर्माण करुन बेकायदेशीरपणे वादीस घराबाहेर काढून देण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यामुळे प्रतिवादी यांना दावा मिळकतीमध्ये येवून वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करु नये म्हणून वेळीच पावबंद करणे आवश्यक आहे, नसता वादीचा दावा मिळकतीवरील ताबा जावून वादीस म्हतारपणामध्ये बेघर होण्याची भिती निर्माण झाली आहे. प्रतिवादी हे त्यांच्या कुटील हेतूमध्ये साध्य झाले तर वादीचा दावा मिळकतीवरील असलेला ताबा जाण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे. वादीने त्याचे समर्थनार्थ नमूना नं. ८ ग्रामपंचायत मिळकत क्र. ८७३ चे सन २०१८–२०१९ कर आकारणी यादी दाखल केली असून मा. उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांच्या न्यायालयात त्याने दाखल केलेल्या अर्जाची प्रत सुध्दा दाखल केली आहे. प्रकरण एकतर्फी असल्यामुळे वादीच्या कथनास कोणताही आक्षेप आलेला नाही. त्याचप्रमाणे दाखल केलेल्या दिनांक १६.०७.२०१९ रोजीच्या अर्जाच्या प्रतीवरुन वादीच्या कथनास दुजोरा मिळत आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीचा दावा हा प्रथमदर्शनी असून सदयस्थीतीत प्रतिवादी यांनी वादी व त्यांचे पत्नीला शिवीगाळ करुन दावा मिळकतीमध्ये अडथळा निर्माण केला व घराबाहेर हाकलून देवून अशी धमकी दिली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली असून, प्रतिवादी हे बळाचा वापर करुन वादीस दावा मिळकतीमधून

कधीही बेदखल करु शकतात अशी भिती निर्माण झाली असल्याची वादीची केस प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे,मुळ दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादीच्या मालकी, ताब्यातील दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी, त्यांचे नौकर चाकर, एजंट हस्तक, नातेवाईक यांनी वादींच्या ताब्यास अडथळा निर्माण करु नये म्हणून वादी यांनी प्रतिवादी यांना तात्पुरता मनाईहुकूमाचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्ज निकाली काढतांना, आवश्यक असणारे तिनही मुद्दे आणि वादीची प्रथमदर्शनी केस असल्याचे सद्यस्थितीत दिसून येते. अशापरिस्थितीत त्यामुळे, तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे नुकसान होईल ही बाब वादीने सिध्द केली आहे, हे म्हणणे न्यायोचित आहे. म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ३ करिता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

## <u>मुद्दा क्र. ४ साठी</u> –

९. वर केलेली चर्चा व मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा निशाणी ५ चा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४, त्यांचे नोकर चाकर, त्यांचे नातेवाईक व त्यांच्या तर्फे हक्क सांगणा–या कोणत्याही व्यक्तीने वादी यांच्या मालकीच्या व ताब्यातील, मौजे शिवना, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ८७३, क्षेत्र ३८ x १९ (दाव्यामधील नमूद वादमिळकत ) उपभोगास अडथळा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत देण्यात येत आहे.

३. वादी व प्रतिवादी यांनी अर्जाचा खर्च ज्याचा त्यांनी सोसावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MINAKSHI MANOHAR DHANRAJ
Date: 2023.01.12 13:56:13 +0530

(श्रीमती मिनाक्षी म. धनराज)

दिनांक:११.०१.२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सिल्लोड.

**CERTIFICATE**

“ I affirms that the contents of this P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B.S. Jadhav |
| Court Name | : | Smt. Minakshi M. Dhanraj<br>Civil Judge Junior Division,<br>Sillod. |
| Date | : | 11.01.2023 |
| Order signed by<br>presiding officer on | : | 11.01.2023 |
| Order uploaded on | : | 12.01.2023 |